स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या कर्तव्यावर असतांना जखमी झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना तसेच मृत झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान देणेबाबत..

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

क्रमांक - रानिआ/जिपपंस/२००६/प्र.क्र.२० /का.७

नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,

मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.

दिनांक- १०/०१/२०१२

वाचा: १) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/जिपपंस/२००६/प्र.क्र.२०/का.७, दि. १२/२/२००७.

२) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. सीईएल-२००९/ प्र.क्र.२१९/०९/३३, दि. १७/४/२००९.

## आदेश

राज्य निवडणूक आयोगाच्या दि. १२/२/२००७ च्या आदेशान्वये राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषदा, नगर पंचायती, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या तसेच ग्रामपंचायतीच्या निवडणुकीमध्ये कर्तव्यार्थ हजर असलेल्या कर्मचाऱ्यांचा कर्तव्य कालावधीमध्ये मृत्यू झाल्यास अथवा कर्तव्य बजावत असतांना त्याला ईजा पोहचल्यास खाली नमूद केल्याप्रमाणे सानुग्रह देण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे :-

१) निवडणुकीच्या कामावर असतांना कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्यास त्याच्या वारसास रु. ५०,०००/- इतके अनुदान अनुज्ञेय राहील.

२) निवडणुकीच्या कामावर असतांना कर्मचाऱ्यास ईजा पोहोचून कायमचे अपंगत्व आल्यास संबंधित कर्मचाऱ्यास रु. २०,०००/- इतके अनुदान अनुज्ञेय राहील.

३) निवडणुकीचे कामकाज करतांना कोणत्याही प्रकारची किरकोळ ईजा झाल्यास संबंधित कर्मचाऱ्यास रु. १०,०००/- सानुग्रह अनुदान देय राहील.

सामान्य प्रशासन विभागाने दि. १७ एप्रिल, २००९ च्या शासन निर्णयान्वये लोकसभा / विधानसभेच्या निवडणुकीच्यावेळी निवडणुकीच्या कर्तव्यावर असतांना जखमी झालेले अधिकारी / कर्मचाऱ्यांना व मृत झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना (वाढीव दराने) सानुग्रह अनुदान देण्याबाबत निर्णय घेतलेला आहे. त्याच धर्तीवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांच्या संदर्भातील वाढीव दराने सानुग्रह अनुदान मंजूर करणे आवश्यक आहे असे राज्य निवडणूक आयोगाचे मत झाले आहे.

वरील परिस्थितीत राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषदा, नगर पंचायती, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या तसेच ग्रामपंचायतीच्या निवडणुकीमध्ये कर्तव्यार्थ हजर असलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्याचा कर्तव्य कालावधीमध्ये मृत्यू झाल्यास त्याच्या वारसाला अथवा कर्तव्य बजावत असतांना अधिकारी / कर्मचाऱ्यास ईजा पोहचल्यास त्यांना खाली नमूद केल्याप्रमाणे वाढीव दराने सानुग्रह देण्यात यावे असे आदेशित करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | तपशिल | सानुग्रह अनुदान रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | निवडणुकीच्या कर्तव्यार्थ असतांना मृत पावलेले अधिकारी / कर्मचारी यांचे वारस. | ५,००,०००/- |
| २ | निवडणुकीच्या कर्तव्यार्थ असतांना अतिरेकी कारवाया नक्षलवाद्यांच्या कारवाया यात बॉम्ब स्फोट, सुरुंग, अथवा शस्त्राचा हल्ला (Road Mines, Bomb Blasts, Armed Attack, etc.) यामध्ये मृत पावलेले अधिकारी / कर्मचारी यांचे वारस. | १०,००,०००/- |
| ३ | निवडणुकीच्या कर्तव्यार्थ असतांना कायमस्वरुपी अपंगत्व आलेले अधिकारी / कर्मचारी जसे हातपाय किंवा डोळा गमविणे. | २,५०,०००/- |
| ४ | निवडणुकीच्या कर्तव्यार्थ असतांना अतिरेकी कारवाया नक्षलवाद्यांच्या कारवाया यात बॉम्ब स्फोट, सुरुंग पेरणी, अथवा शस्त्राचा हल्ला इ. (Road Mines, Bomb Blasts, Armed Attack, etc.) यामध्ये कायमस्वरुपी अपंगत्व आलेले अधिकारी / कर्मचारी. जसे हातपाय किंवा डोळा गमविणे. | ५,००,०००/- |

राज्यातील महानगरपालिका, नगर परिषदा, नगर पंचायतीच्या निवडणुकांवरील खर्च हा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेने करावयाचा असल्याने असे अनुदानाचे प्रस्ताव प्रकरणपरत्वे संबंधित महानगरपालिका आयुक्त किंवा मुख्याधिकारी, नगरपालिका / नगर पंचायत यांनी मंजूर करावेत.

जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतींच्या निवडणुकांवरील खर्चाकरिता राज्य शासनाच्या ग्राम विकास विभागाकडून अनुदान देण्यात येते. त्यामुळे या निवडणुकांच्या संदर्भात सानुग्रह अनुदान मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव संबंधित जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या अभिप्रायासह ग्राम विकास विभागास मंजुरीसाठी सादर करावा.

सदर आदेश या आदेशाच्या दिनांकापासून अंमलात येतील.

नीला सत्यनारायण
१०.९.९२

( नीला सत्यनारायण )
आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

१) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
२) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
३) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
४) आयुक्त, सर्व महानगरपालिका.
५) सर्व विभागीय आयुक्त.
६) सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
७) मुख्याधिकारी, सर्व नगरपरिषदा / नगर पंचायती.